स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता लागू असल्याच्या कालावधीत जिल्हा नियोजन समितीची बैठक घेणेबाबत.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक — रानिआ/ग्रापनि/२०१२/प्र.क्र. ६ /का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
दिनांक- २१ / ०८/२०१२

## आदेश

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची सांविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. आयोगाने निवडणुकांचा कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून (रात्री १२ वाजल्यापासून) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू होते. तसेच सदरची आचारसंहिता ही मतमोजणीच्या दिनांकापर्यंत लागू रहाते. आचारसंहितेच्या कालावधीत जिल्हा नियोजन समित्यांची बैठक आयोजित करता येईल किंवा कसे या मुद्दयावर शासनाकडून तसेच जिल्हाधिकारी यांचेकडून वारंवार आयोगाकडे विचारणा केली जाते. या मुद्दयावर राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असलेल्या क्षेत्रात बैठक आयोजित करण्यात येऊ नये.

२) आचारसंहिता लागू असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत, नगर परिषद तसेच ग्रामपंचायतीच्या क्षेत्राकरीता नविन योजना जाहीर करता येणार नाही. मात्र या क्षेत्रापैकी एखाद्या ठिकाणी दुष्काळ अथवा पाणी टंचाई असेल तर ती दूर करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रत्यवाय असणार नाही.

३) जिल्ह्यामध्ये ज्यावेळी मोठ्या प्रमाणावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात येत असतील त्यावेळी समितीचे अध्यक्ष / पालक मंत्र्यांनी वार्ताहार परिषद आयोजित करु नये. तसेच संबंधितांनी राजकीय स्वरुपाचे भाषण करु नये.

F:/forward OSD

४) राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आचारसंहितेबाबत दि.२९/१२/२०११ रोजी निर्गमित केलेल्या एकत्रित आदेशातील तरतुदींचे पालन करणे सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( वि. मा. पानसरे )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
२) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
३) सर्व विभागीय आयुक्त.
४) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.

arward OSD